ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 7 | MARCH - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

सत्यशोधक चळवळ : बदलते संदर्भ

डॉ.तानाजी अं.देशमुख
मराठी विभागप्रमुख, वसुंधरा कला महाविद्यालय,जुळे सोलापूर.

प्रस्तावना :

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात सत्यशोधक चळवळ ही परिवर्तनवादी सामाजिक चळवळ होती. २४ सप्टेंबर १८७३ रोजी म. फुल्यांनी आपल्या सहकाऱ्यासोंबत सत्यशोधक समाजाची स्थापना करुन, आपल्या कार्याला संस्थागत रुप दिले. गरीब, कष्टकरी, स्त्री, शेतकरी, कामगार, शुद्रातिशूद्र यांच्या समस्या सोडविण्यासाठी सत्यशोधक समाजाने कृतिशील चळवळ उभारली . आपल्या लढयाला वैचारिक अधिष्ठान देऊन लोकजागृती करण्यासाठी साहित्यनिर्मिती केली.म. फुले यांच्या कार्याचा, लेखनाचा व विचारसरणीचा प्रभाव सत्यशोधक कार्यकर्त्यावर पडला. यामुळे अन्वेषक दृष्टीच्या कार्यकर्त्यांची व साहित्यिकांची परंपरा महाराष्ट्रामध्ये निर्माण झाली. या सत्यशोधक चळवळीचे बदलते स्वरुप या विषयांवर विचार काही ठळक मुद्याधारे करण्याचा प्रयत्न केला आहे.

स्वातंत्र्य, समता व बंधुता या नवमूल्यांच्या पायावर जोतीरावांना समाजाची उभारणी करावयाची होती. म्हणून त्यांनी कालबाह्य जुनाट रढी परंपरेवर चौफेर हल्ले चढविले. आपल्या विचारांना शब्दबध्द करण्यासाठी १८५५ साली म. फुल्यांनी तृतीय रत्न हे मराठीतील पहिले ग्रामीण सामाजिक नाटक लिहिले. साध्या- भोळया, अज्ञानी शेतकऱ्यांची फसवणूक करुन धर्मविधीच्या नावाखाली धूर्त ब्राह्मण कशी लूटमार करतात याचे वास्तवस्पर्शी चित्रण या नाटकातून केले आहे. जोतीरावांचे कार्य व विचार बंडखोर होते. त्यांची जहाल मते सनातनी ब्राह्मणांच्या वर्मी घाव घालत होती. त्यामुळे १८५६ मध्ये या मंडळीनी त्यांच्या हत्येचा असफल प्रयत्न केला.माणसाला जन्म देणारी, त्याचे संगोपन व संवर्धन करणारी स्त्री पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे, असे ते मानत. विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न हा जरी ब्राह्मण किंवा इतर उच्च जातीशी निगडित असला तरी त्यांनी तो आपल्या कार्याचा व विचाराचा भाग मानला. सक्तीचे बालविवाह, त्यातून ओढवणारे अकाली वैधव्य, बालमृत्यू शारीरिक हानी, केशवपनाची विद्रुपता, वासनांच्या कोंडीतून घरच्याकडून लादला जाणारा व्याभिचार ,शापित मातृत्वाची बदनामी टाळण्यासाठी आत्महत्येचा मार्ग स्वीकारणाऱ्या स्त्रिया यासारख्या अमानूष प्रकारापासून स्त्रियांची सुटका करणाऱ्या सुधारणावादी चळवळींना म. फुल्यांनी पाठिंबा दिला. त्यांनी ८ मार्च १८६० रोजी शेणवी जातीतील एका विधवेचा पुनर्विवाह घडवून आणला. १८६३ साली ' बालहत्या प्रतिबंधक गृह 'सुरु केले. ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री-पुरुष तुलना' या पुस्तकाची दखल त्यांनी' सत्सार भाग-२' मध्ये घेतली. स्त्रियांच्या भावभावनांची जपणूक करुन स्त्री उन्नतीचे कार्य करणारे जोतीराव हे पहिले स्त्रीवादी विचारवंत होते.

जोतीराव हे समतेचे पुरस्कर्ते असल्यामुळे जातिभेद आणि अस्पृश्यतेवर त्यांनी कडाडून हल्ला चढविला. जातिव्यवस्थेवर प्रहार केल्याशिवाय शुद्रातिशूद्राचे हाल कमी होणार नाहीत म्हणून त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथात जातिव्यवस्थेचा खरपूस समाचार घेतला. धर्माच्या छायेत लपलेल्या संकुचित, स्वार्थी व स्वहितजपणाऱ्या ब्राह्मणांनी आपल्या बचावासाठी जातिभेदाची तटबंदी उभारुन जाती जातीत भेदाभेद करुन समाजाचे तुकडे तुकडे केले आहेत. या आशयाच्या तुकाराम तात्या पडवळ यांनी लिहिलेल्या 'जातिभेद विवेकसार 'या ग्रंथाची दुसरी आवृत्ती १८६५ साली जोतीरावांनी प्रकाशित केली. त्यांनी काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवेचा मुलगा दत्तक घेतला. '१८६८ साली अस्पृश्यांना पाणी भरण्यासाठी आपल्या घराजवळील पाण्याचा हौद खुला केला. या वर्षीच कृष्णराव भालेकर यांची म. फुले व मोरो विठ्ठल

वाळवेकर यांच्याशी भेट झाली.त्यानंतर कृष्णराव सत्यशोधक समाजाचे सभासद झाले.[१] म. फुलेनी 'कुळवाडीभूषण 'असे नामाभिधान प्रथम वापरुन शिवाजी महाराजाचा अव्वल इंग्रजी कालखंडातीन पहिला पोवाडा १८६९ साली लिहिला. या वर्षीच प्रसिध्द झालेल्या त्यांच्या 'ब्राह्मणाचे कसब 'या काव्यसंग्रहात अज्ञान, निरक्षरता व अधश्रध्देमुळे भटभिक्षुकांकडून शेतकरी कसा नागविला जात आहे याचे वास्तवदर्शी व उद्बोध्दक वर्णन केले आहे. आपल्या कार्याला व विचाराला सनातन्यांचा विरोध वाढू लागला हे जोतीरावांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी आपले लक्ष सामाजिक कार्याकडे वळविले. स्वजनाकडून अमर्याद छळ होत असताना इतक्या आस्थेन सामाजिक व धार्मिक परिवर्तनाचे कार्य करणारे जोतीराव हे हिंदुस्थानाच्या इतिहासात पहिले थोर पुरुष आहेत.

इ. स. १८७३ साल हे सत्यशोधक चळवळीच्या वैचारिक व संघटनात्मक दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले. ब्राह्मणांच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गाला मुक्त करण्यासाठी चळवळ निर्माण करण्याचा निश्चय म. फुलेंनी घेतला. बुध्दीप्रामाण्यवादी, शोषणमुक्त समतामूलक समाज परिवर्तनाचे विचार आपले अनुयायी व शेतकरी-कामगार लोकसमूहापर्यंत पोचविण्यासाठी संघटनेची गरज भासू लागली. यातूनच सत्यशोधक समाजाची स्थापना त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे आपल्या सहकाऱ्यासमवेत केली. यावेळी महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेले ६० अनुयायी हजर होते. सत्यशोधक समाजाचा उद्देश पुढीलप्रमाणे स्पष्ट केला,'ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादी लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांस मुक्त करण्याकरिता व आपल्या मतलबी ग्रंथाच्या आधारे आज हजारो वर्षे ते शूद्र लोकांस नीच मानून गफलतीने लुटीत आले आहेत. यास्तव सदुपदेश व विद्याव्दारे त्यास त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता म्हणजे धर्म व व्यवहारासंबंधी ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथापासून त्यांस मुक्त करण्याकरिता कांही सुज्ञ मंडळींनी हा समाज स्थापन केला. या समाजात राजकीय विषयावर बोलणे अजिबात वर्ज्य आहे.[२] मानवी हक्क आणि अधिकारांची प्रतिष्ठापना, गुलामीतून मानवाची मक्तता ,शोषणमक्त समाज, धर्म आणि धर्मग्रंथाची बुध्दिवादी दृष्टीकोनातून चिकित्सा, शूद्र अस्मितेचा अभिमान आणि राजकारण विरहित कार्य हे सत्यशोधक समाजाचे ध्येयधोरण होते. १९११ साली पुणे येथे झालेल्या सत्यशोधक समाजाच्या पहिल्या परिषदेत सत्यशोधक समाजाची तीन तत्वे सांगितली गेली.[३]

१) सर्व माणसे एकाच देवाची लेकरे आहेत व देव त्यांचा आई बाप आहे.
२) आईला भेटण्यास अगर बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थांची जरुरी नसते.त्यापमाणे देवाची प्रार्थना करण्यास पुरोहित अगर गुरु यांची आवश्यकता नसते.
३) वरील तत्त्व कबूल असल्यास कोणालाही सभासद होता येते.

सत्यशोधक समाजाचे सभासद होताना आपण सर्व भावंडे आहोत अशा बुध्दीने वागण्याची, धार्मिक विधीतील मध्यस्थाची मदत न घेण्याची, आपल्या मुली- मुलांना शिक्षण देण्याची शपथ घ्यावी लागे. सत्यशोधक समाजाने लोकपरंपरेचे भान ठेवले होते. 'समाजाचे सभासद होतेवेळी तळी उचलावी लागत असे. तळी उचलताना खंडोबा, बहिरोबा यांच्या नावाचा उल्लेख केला जाई. यळकोट यळकोट असा पुकारा केला जात असे. तळीचे सामान म्हणून एका पिशवीत भंडारा, गुलाल,गुळाचा खडा, खोबऱ्याच्या वाटया,धने, विडयाची पाने,सुपारी इत्यादी जिनसा ठेवीत.[४] समाजाचे सभासद होण्यास जात-धर्म व सप्रदाय याचे बंधन नव्हते. दर आठवडयाला होणाऱ्या सभेत सत्य, सद्विचार, जातिव्यवस्था, दारुबंदी, मुर्तिपूजा, पुरोहितशाही, शिक्षण, शेती व शेतकरी इत्यादी विषयांवर विचारविनिमयच होत असे. सत्यशोधक समाज ही सामाजिक व धार्मिक पुनर्रचनेच्या उद्देशाने एकसंध,तत्त्वनिष्ठ व निर्भयपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची चळवळ होती.

चळवळीच्या स्थापनेपासूनच (१८७३ ते १९३०) ही चळवळ आपल्या कार्याने व विचाराने सर्वदूर पसरली. सत्यशोधक चळवळीचे राजकीय अंग असलेल्या ब्राह्मेणतर पक्षाचे १९३० नंतर कॉग्रेंसमध्ये विलीनीकरण झाले. त्यामुळे सत्यशोधकीय स्वतंत्र विचारधारा काँग्रेसच्या मुख्य प्रवाहात मिळाली. मात्र म. फुले यांचे विचारकार्य व सत्यशोधक तत्वविचार यातून

[1] गुंदेकर, श्रीराम,-सत्यशोधकी साहित्याचा इतिहास,खंड पहिला,सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, लातूर, आवृत्ती प्रथम,२०१०,पृ २२५

[2] फडके, य. दि.(सं)-महात्मा फुले समग्र वाड्.मय म. रा.साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, आवृत्ती पाचवी, १९९१,पृ.१९५

[3] .बागल, माधवराव,(सं) सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ, श्री शाहू सत्यशोधक समाज, करवीर, १९३३, पृ.९६

[4] कीर, धनंजय-म.जोतीराव फुले,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई १९९२, आवृत्ती चौथी,पुनर्मुद्रण २०००,,पृ.५३

तयार झालेल्या सत्यशोधकीय विचारप्रणालीचा प्रभाव या काळात दिसून येतो. या कालखंडात सत्यशोधक चळवळीने शेतकरी , कष्टकरी यांच्या जागृतीचे केलेले कार्य, सत्यशोधक जलशे, आंबेडकरी जलशे, शिक्षण, ब्रिटिश प्रशासनामधील जाणीवजागृती यामुळे बहुजन समाजात जागृतीची लाट निर्माण झाली होती. सर्वदूर महाराष्ट्रात विस्तारलेला बहुजन समाजाचे अनुभवविश्व, कृषिनिष्ठ जीवनजाणिवा, मूल्यगर्भ विचारदृष्टी इत्यादी सत्यशोधकीय वाङ्:मय निर्माण झाले. या चळवळीच्या कार्यातून प्रेरणा घेऊन अनेक परिवर्तनवादी ब्राह्मणेतर चळवळी व संघटना आज कार्यरत आहेत. सत्यशोधक चळवळीचा विस्तार व वाटचालीच्या अनुषंगाने सहा टप्पे पडतात.

१ फुले- भालेकर -लोखंडे काळ :-(१८७३ -१८९५)
२ प्रसार व प्रबोधनाचा काळ:-(१८९६-१९१०)
३ शाहू महाराजांच्या प्रभावाचा काळ :-(१९११ -१९१८)
४ ब्राह्मणेतर चळवळीचा काळ :- (१९१९ -१९३०)
५. स्वतंत्र्य महाराष्ट्र निर्मितीपूर्वीचा काळ १९३०-१९६०
६. स्वातंत्र्योत्तर सत्यशोधकीय विचारधारा (१९६०-२०२०)

महाराष्ट्रात पेशवाई जाऊन ब्रिटिश अंमल सुरु झाला होता. पाश्चात्य ज्ञानविज्ञानाच्या प्रभावाने समाजसुधारणेचा विचार बलवत्तर झाला व त्यातून प्रबोधनपर चळवळीना प्रारंभ झाला. महात्मा फुलेंनी प्रबोधनपर साहित्याची वेगळी परंपरा सुरु केली. १८८५ साली त्यांनी मराठी ग्रंथकार सभेस पत्र लिहून आपली साहित्यविषयक भूमिका स्पष्ट केली. 'ज्या गृहस्थाकडून एकंदर सर्व मनुष्याच्या मानवी हक्काविषयी वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यास ते हक्क त्यांच्याने खुषीने व उघडपणे देववत नाहीत..... तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांनी व त्यांनी केलेल्या पुस्तकातील भावार्थाशी आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ बसत नाही.. .. .. आम्हां शुद्रादि- अतिशुद्रांस काय काय विपत्ती व त्रास भोगावे लागत हे त्यांच्यातील उंटावरुन शेळया वळणा-या ग्रंथकारास व मोठमोठया सभास्थानी आगंतूक भाषण करणा-यास कोठून कळणार ? सारांश , यांच्यात मिसळल्याने आम्हा शुद्रादि-अतिशुद्रांचा काही एक फायदा होणे नाही, यावद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे. ' म. फुले यांची भूमिका तत्कालीन प्रस्थापित साहित्य परंपरेपेक्षा वेगळी, अधिक वास्तव, समाज जीवनाचा तळ शोधणारी, मातीशी इमान राखणारी, कलात्मकतेचा मुलाहिजा न बाळगता सर्वसामान्य शोषितांचे जीवनदर्शन समरसून घडविणारी, लोक जागृतीसाठी तळमळणारी होती. ग्रामीण जीवनात बदल व्हावा, ग्रामीण माणसाला प्रतिष्ठा मिळावी, त्यांच्या श्रमाचे यथोचित मूल्य त्याला मिळावे, त्याचे जगणे एकूण समाजाच्या केंद्रस्थानी यावे, जेणेकरुन त्यांच्या जगण्याला काही एक अर्थ, प्रतिष्ठा प्राप्त होईल, अशा प्रकाराच्या माणूसकेंद्रित विचाराची मुहूर्तमेढ महात्मा फुले यांच्या साहित्याने रोवली गेली. डॉ. आनंद यादव यांच्या मते, 'ग्रामीण साहित्याची चळवळ ही म. फुले यांच्या मानवतावादाचा , शुद्रातिशुद्रांवर व स्त्रियांवर होणा-या अन्यायाचा व त्यांच्या विकासाचा, छोटे शेतकरी, खंडकरी कुळे, कुणबी , शेतमजूर, खेडयातून नागर विभागात पाटार्थी होऊन आलेले झोपडपट्टीवासीय मजूर, कामगार, दलित व आदिवासी यांच्या होणा-या शोषणाचा ती वारसा सांगते. या सर्वाच्या विकास उध्दारार्थ काळाच्या आघोत ज्यांनी ज्यांनी कार्य केले व विचार मांडले, त्यांचा व त्यांच्या आवश्यक त्या विचारांचा ती वारसा सांगते. कुठल्याही एका व्यक्तीची किंवा विभूतीची किंवा फक्त तिच्याच विचारांची ती पूजक नाही. म. फुल्यांचे ती प्रथम नाव घेते. याला कारण ते मानवतावादाचे आद्य पुरस्कर्ते विचारवंत आहेत म्हणून.ग्रामीण विभागात राहणा-या शुद्रातिशुद्रांची पहिली जाणीव त्यांनी मराठी समाजाला करुन दिली म्हणून.[५] याचा अर्थ असा आहे की, ग्रामीण जीवनदर्शनाचा स्पर्श महात्मा फुल्यांनी मराठी साहित्याला घडविला.

१९३० ते १९६० करणारे केशवराव विचारे(१८८९-१९९४) या काळात थोर समाजसुधारक विठ्ठल रामजी शिंदे (१८७३-१९४४), सत्यशोधक विचारवंत व 'दीनमित्र' या साप्ताहिकाचे संपादक मुकुंदराव पाटील (१८८५-१९६), सत्यशोधक -ब्राह्मणेततर चळवळीतील कार्यकर्ते, 'कैवारी' व 'तेज' या वृत्तपत्राचे संपादक दिनकरराव जवळकर (१८९८-१९३२), सत्यशोधक - ब्राह्मणेतर पक्षाचे ज्येष्ठ नेते 'मराठा दीनबंधु' चे संपादक भास्करराव जाधव (१८९६-१९५०), बेळगाव भागातील सत्यशोधक चळवळीचे सक्रीय नेते 'राष्ट्रवीर' साप्ताहिकाचे संस्थापक शामराव देसाई (१८९६-१९७१), शेतकरी कामगार पक्षाची स्थापना व भूमिका निश्चित करण्यामागे महत्त्वपूर्ण योगदान असणारे ब्राह्मणेत्तर चळवळीचे नेते शंकरराव मोरे (१८९९-१९६६), आपल्या कीर्तनप्रवचनांतून आयुष्यभर समाजप्रबोधनाचे कार्य करणारे संत गाडगे बाबा (१८७६-१९५६),

[5] यादव आनंद, मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती,महता पब्लिशिंग हाऊस,पुणे,व्दि.आ.१९९३, पृ. ७७

विसाव्या शतकातील थोर सत्यशोधक समाजसुधारक, पत्रकार, साहित्यिक, कलावंत असे व्यक्तिमत्व म्हणजे भाधवराव बागल (१८९८-१९८६), रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील(१८८८-१९५९) , सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व कृषी क्षेत्रामध्ये महत्त्वपूर्ण योगदान असणारे पंजावराव देशमुख(१८९८-१९६५) , 'विजयी मराठा' साप्ताहिकाचे संपादक, सत्यशोधक चळवळीचे नेते श्रीपतराव शिंदे (१८८३-१९४४), बडोद्याहून प्रसिध्द होणा-या 'जागृति' या सत्यशोधक विचाराच्या साप्ताहिकाचे संस्थापक भगवंतराव पाळेकर(१८८२-१९७३), सत्यशोधक विचारांचा आयुष्यभर निष्ठेने प्रचार करणारे केशवराव विचारे (१८८९-१९९४) इत्यादी सत्यशोधक विचारवंतानी, चळवळीतील कार्यकर्तानी समाजाचे प्रबोधन व परिवर्तन वैविध्यपूर्ण रीतीने केलेले आहे.ग्रंथ, छोटया पुस्तिका, परिषदा, सभासंमेलने, अधिवेशने मधील भाषणे, प्रासंगिक स्फुटलेखन वगैरे प्रकारांमधून विपुल प्रमाणात सत्यशोधक विचारप्रणालीचे वैचारिक वाङ्:मय निर्माण झालेले आहे.

१९६० नंतर महाराष्ट्रातील ग्रामीण भागात विविध समाजगटाना आत्मभान आले. महाराष्ट्रातील लोककल्याणकारी योजना, सार्वत्रिक शिक्षण, सहकार चळवळ, सिंचनयोजना, शेतीचे आधुनिकीकरण, कूळकायदा, रोजगार हमी योजना, तुकडे बील, वगैरेमुळे ग्रामीण भागात नवे स्थित्यंतर घडून आले. जुन्या समस्या सोडवितानां कालानुरुप निर्माण झालेले नवे प्रश्न समोर आले. त्याची उकल गंभीरपणे केली जाऊ लागली. या सर्व बदलांचे प्रतिबिंब या काळातील सत्यशोधकी ग्रामीण विचारप्रणालीच्या वाङ्:मयात आले आहे.

१९६० ते १९८० या कालखंडात आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, प्रगल्भ विचारवंत, धुरंधर राजकारणी व साहित्यिक व्यक्तिमत्वाचे यशवंतराव चव्हाण (१९१३-१९८४), भारतीय स्वातंत्र्यचळवळीमध्ये आघाडीचे नेते देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार(१९०९-१९९८), शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते, 'राष्ट्रवीर' साप्ताहिकाचे संपादक भाई दाजीबा देसाई (१९२५), सातारच्या प्रतिसरकार चळवळीचे अग्रणी क्रांतिसिंह नाना पाटील (१९००-१९७६), महात्मा फुले यांचे आद्यचरित्रकार पंढरीनाथ पाटील (१९०३-१९७८), विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे समाजचिंतक रा. ना. चव्हाण(१९१३-१९९३), इत्यांदीने वैविध्यपूर्णतने आपले सत्यशोधकीय विचारप्रणालीचे विचार या काळात प्रसूत केले आहेत.

शेतकरी -कामगारांच्या प्रश्नावर कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते, ग्रामीण जीवनाचा आपापल्या परीने अन्वयार्थ लावून परिवर्तनवादी विचारप्रकटीकरण करणारे सत्यशोक व्यंकटराव रणधीर, एन. डी. पाटील, केशवराव धोंगडे, भाई उध्दवराव पाटील, बाळासाहेब मोरे, अण्णासाहेब शिंदे, मामासाहेब जगदाळे, उत्तमराव मोहिते, भाई राऊळ, तुळशीदास जाधव, गणपतराव देशमुख, रायभान जाधव, पन्नालाल सुराणा वगैरेंची इत्यांदीच्या विचार व कार्यावर सत्यशोधक विचाराचा प्रभाव दिसतो. 'शेतकरी संघटना: विचार आणि कार्यपध्दती' (१९८२) या ग्रंथामध्ये शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेची भूमिका, उद्दिष्टये, शेतीमालाचा उत्पादन खर्च, अस्मानी संकट आणि सुलताणी शोषण, इडिया आणि भारत, इडियाचं भारताच्या शोषणाविषयीचं पंचशील वगैरे विषयांवर लेख लिहून संधटनेची वैचारिक भूमिका स्पष्ट केली आहे. या भूमिकेचे मूळ सूत्र सत्यशोधक विचारधारच आहे. कॉ. शरद पाटील यांचे भारताच्या सामाजिक, सास्कृतिक इतिहासाची पुनर्मांडणी करणारे लेखन तसेच डॉ. आ. ह. साळुंखे यांचे धर्मचिंतन व भारतीय समाजव्यवस्थेचे चिकित्सक लेखन ग्रामीण साहित्याला बळ देणारे असून सत्यशोकधीय मूल्य अधारेखित करणारे आहे.

सत्यशोधक चळवळीने सर्वप्रथम लोकांना गुलाम बनविणाऱ्या प्रस्थापित परंपरेची बुध्दिवादी दृष्टीने कठोर चिकित्सा केली. ब्राह्मणी, वैदिक परंपरेपासून स्वतंत्र होऊन पर्यायी लोकसंस्कृतीचा पुरस्कार केला. धर्म आणि धर्मग्रंथ मानव निर्मित आहेत. ही वस्तुस्थिती लोकांना समजावून सांगितली. लोकसंस्कृती , लोकपरंपरा, लोक दैवते यांचा पुरस्कार केला. व्यक्तीला विचारशील, विवेकशील,व बुध्दिवादी बनवून आधुनिक समाजरचना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. धार्मिक विधीतून ब्राह्मणांचे उच्चाटन करुन स्वत:चे धर्मविधी व विवाह स्वत:च करावेत असा सत्यशोधक समाजाचा आग्रही विचार होता.

या समाजाने प्राथमिक शिक्षणावर अधिक भर दिला.प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याची मागणी केली.शिक्षणाच्या जागृतीतूनच 'मराठा शिक्षण परिषद', 'रयत शिक्षण संस्था' या साराख्या शिक्षणसंस्था बहुजनाच्या उन्नतीसाठी सुरु झाल्या.

शेतकरी हा या चळवळीचा केंद्रबिंदू होता. बहुजन समाजाच्या आर्थिक विकासासाठी सहकारी संस्था सुरु केल्या. महाराष्ट्रात मोठी सहकार चळवळ निर्माण झाली व तिने ग्रामीण महाराष्ट्रामध्ये आर्थिक परिवर्तन घडवून आणले . सत्यशोधक समाजाने स्त्री -पुरुष समतेला प्राधान्य दिले. शेकडो वर्षे गुलामगिरीत राहिलेल्या माणसात आत्मभान आले व बहुजन समाज आत्मोन्नतीसाठी सजग झाला. बहुजन समाजाच्या मनातून जन्मसिध्द जातिकल्पना निघून आंतरजातीय विवाह करण्याची मानसिकता तयार झाली.

धर्म व ग्रंथ प्रामाण्याऐवजी आधुनिक ज्ञान प्राप्त करुन भौतिक प्रगती करण्याचा विचार सामान्य माणसाच्या मनामध्ये रुजला आहे.बहुजन समाजाला शेकडो वर्षापासून शोषणारी पुरोहितशाही व भिक्षूकशाही यांची धार क्षीण झाली

आहे. धार्मिक विधीतील मध्यस्थ नाहिसा होत आहे. कृषिजन समूहांना आपल्या हक्काची व उन्नतीची जाणीव झाली. त्यांच्या लढयाला योग्य दिशा व गती मिळाली. ग्रामीण भागात राजकीय जाणिवा जागृत झाल्या. बहुजनांचा राजकारणात प्रवेश झाला. ग्रामीण नेतृत्व उदयास आली.

सत्यशोधक चळवळीपासून प्रेरणा घेऊन आधुनिक महाराष्ट्रात ग्रामीण, दलित, आदिवासी, शोषित, वंचित, उपेक्षित यांनी आत्मोन्नतीसाठी लढे सुरु केले. स्वातंत्र्योत्तर काळात विविध मराठी साहित्य प्रवाह निर्माण झाले. सत्यशोधक चळवळीने सहकार चळवळीचा पाया घातला. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात जनसामान्यांच्या सहभागाने सहकारातून समृध्दीचा मार्ग सुकर झाला. आधुनिक, प्रगतिशील, पुरोगामी महाराष्ट्राच्या निर्मितीचा वैचारिक व कृतिशील पाया सत्यशोधक चळवळीने घातला.

आजच्या सामाजिक प्रश्नासंदर्भात सत्यशोधक विचारसणीचा अन्वायार्थ लावून सत्यशोधक चळवळ गतिमान करण्याची अत्यंत आवश्यकता निर्माण झाली आहे. आज धार्मिक मूलतत्त्ववादी शक्ती सर्व बाजूंनी उठाव करीत आहेत.. देवाधर्माच्या व संप्रदायाच्या नावाखाली पुन्हा वर्णव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्नात आहेत. बुवा, बापू, माँ, बाबा वगैरे नावांनी धर्ममार्तंडांचे प्रस्थ वाढत असून समाज बैठका, सभा यात उपस्थित राहून मानसिक गुलामगिरीकडे पुन्हा जात आहे. धार्मिकस्थळे, मंदिरे, तीर्थक्षेत्रे, जत्रा, यात्रा, कुंभमेळा वगैरे ठिकाणी प्रचंड गर्दी होत आहे. अशा ठिकाणी सामान्य माणसाची बेसुमार लूट होत आहे. प्रभावी आणि जलद आधुनिक प्रसार माध्यमांनी सामान्य माणसाची विचार प्रक्रिया खंडीत केली आहे. धार्मिक व जातीय अस्मितेचे भान वाढल्याने , दंगली निर्माण होऊन संपूर्ण जीवनच असुरक्षित बनत आहे. पुरोगामी महाराष्ट्रात प्रखर वैचारिकतेचा बळी जात आहे.

जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण यांच्या नावाखाली प्रचंड सामर्थ्यासह नवभांडवलशाही येत आहे. श्रीमंत आणि गरिबामधील दरी वाढत असून आर्थिक विषमता निर्माण झाली आहे. दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहे. आत्महत्या करीत आहे.सहकार चळवळीला भ्रष्टाचाराची कीड लागली आहे. आज कायद्याने प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असले तरी मराठी माध्यमाच्या शाळा विद्यार्थीसंख्या अभावी बंद पडत आहेत.सरकारी धोरणे या शाळा बंद पाडण्यास अनुकूल दिसत आहेत. मराठी विद्यार्थ्याचा पालक वर्ग हा गरीब कष्टकऱ्यांचा आहे. प्राथमिक शिक्षणाची दैन्यावस्था, महागडे उच्च शिक्षण यामुळे सामान्य विद्यार्थी या शिक्षणापासून खूप दूरवर फेकला जात आहे. शिक्षण क्षेत्रातील भांडवलशाहीने गरीब, दुर्बल, वंचितांच्या शिक्षणांचे अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. एकूणच जागतिकीकरणामुळे समाजात दोन वर्ग पडू लागले आहेत. 'आहे रे 'आणि 'नाही रे 'या वर्गातील दरी दिवसेंदिवस वाढत आहे.

समाजात मानवी समता , स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा, बंधुता, सहिष्णुता, बुध्दिवाद आदी मूल्यांची कुचेष्टा करुन कालबाह्य मानण्याची प्रवृती बळावत आहे. समाजात धार्मिक , सामाजिक, मानसिक व आर्थिक गुलामगिरीची दाट छाया पडत आहे. या बिकट परिस्थितीतून वाट काढण्यासाठी आजही सत्यशोधक चळवळीचे विचार उपयुक्त आहेत. सामान्य माणसाच्या जीवनाचा लीढा लढण्यास सत्यशोधक समाजाचे विचार कोणत्याही काळात मार्गदर्शक ठरु शकतील आणि माणूस सत्त्वशील बनेल.